गणेश विसपुते

# सिनार



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४६२

REFBK-0023617
REFBK-0023617

साकेत प्रकाशन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४६२
दा. क्र. २३६१७
काव्य ७/४८२
संद. शाखा (स्थळ प्रत)

गणेश विसपुते

# सिनार

REFBK-0023617
REFBK-0023617

साकेत प्रकाशन/प्रथमावृत्ती फेब्रुवारी/१९८२
© गणेश रघुनाथ विसपुते
प्रकाशक/जी. सी. मोरे, बन्सीलालनगर, औरंगाबाद.
मुद्रक/व्यवस्थापक, मॉडर्न प्रिंटिंग प्रेस, रोहिलागल्ली, औरंगाबाद.
मुखपृष्ठ/संजय अष्टपुत्रे
किमत दहा रुपये

---

या पुस्तकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अनुदान मिळाले आहे.

मायमाऊलीस . . .

# औरंगाबादच्या तीन कविता

प्रचंड ऐतिहासिकपणाच्या कोंदणात
औरंगाबाद.
ऐतिहासिक परंपरे इतकीच जुनी
आमची गल्ली. आमचे जन्मस्थान.
साठवित, कोरीत आलो–
तिची ऐतिहासिक परंपरा.
गल्लीची टोकं दोन.
कलत्या रात्री बरोबर–
तंबोरे-तबले–सतारी जुळवित
मेहमानांच्या फर्माईशींवरून
कव्वाल्या, चीजा गायल्या जाणं.
त्यात रात्र विरून जाणं.
ही ही एक परंपराच.
–हे एक टोक.
दुसरं टोक,
वाढत्या रात्री बरोबर गर्दी वाढविणारे.
जा-ये करणारे मेहमान; त्यांचे दिवसाचे
बेगडी चेहरे, मुखवट्याखालची गिधाडं.
अखंड सौभाग्यवतीच्या चक्काचूर
जीवनाचे एकेका रात्रीचे मेहमान.
क्षणिक अग्निडोंब विझण्यासाठी
एकेका जीवनाच्या केलेल्या चिंध्या.
अग्निडोंबातच जणू जाळण्यासाठी.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क. ....
संदर्भ शाखा (स्थळ

सूरांची जाण नव्हती तेंव्हा.
पण लालचुटूक ओठांच्या, पैंजण बांधून
गाणाऱ्या बाईला
पहायला, आम्हा पोरांना –
प्रवेश मोफत असणं. म्हणून जाणंही.
सगळ्यात मागे, पालथी मांडी घालून
गुपचूप बसणं.
एकेक पै मोजून घेणारे
दिवसाचे शेठजी,
त्यांचे उडणारे पैसे, अन–
लालचुटूक ओंठांच्या मालकिणीचा
लवून केलेला ' सलाम '
लक्षात राहिलेली वैशिष्टये

परवा मी मोठा झालो अन पाहूयलं,
एका वादळानंतर–
गाणाऱ्या इमारतीचा कठडा पडून
पैंजण गेलेत दिगंतर.
दुसरं टोक ही हरवलंय.
कळलं–
गल्लीतल्या नागरिकांची (?)
सामूहिक तक्रार
अन् दोन टोकं सीमापार.

वाटलं सालं गल्लीला आता
काही ऐतिहासिकपण
उरलं नाही.

सिनार–६

गालिचे, लोड, पानदान,
सलाम – अन ती मोगलाई अदब
आता दिसणे नाही.
लटकत्या झुंबरात आता
दिवे जळणे नाही.
टोकावरच्या मर्क्यूरी बल्बच्या
प्रखर प्रकाशात पूर्वीचा
डोक्यांना साहणारा अंधारही
हरवलाय.
थकली सारंगी कुठे विश्रांती घेत असेल?

## २. मस्तानी

तर या माझ्या गल्लीत
ती राहयची.
तिच्याकडे तिच्याच वयाचा
अेक तरुण यायचा.
ती पैसे कमवायची,
व्यवसाय करायची–
त्यांच्या लग्नासाठी.
केव्हा केव्हा रडायचीही.
मी घराच्या खिडकीत बसून–
अनेकदा तिच्या आंतरिक
आंदोलनात डोकावण्याचा
प्रयत्न केला
आणि प्रत्येकदा तिच्याशी
तिच्या खोलीतला अंधार
बोलताना पाहयला.

ती कंचनी होती.
( आता झालेली संवेदना. )
कुठल्याशा रोगाने, त्यावेळी
काही कळत नव्हते–ती मेली.
रात्री, झुंबरातली एक पणती निमाली.
कोणी नव्हतं मागचं. कुठली कोण–
हे ही नव्हतं माहित
मस्तानी जवळ त्या–
बाजीरावच होता फक्त रडत !

३.
शाळेतही जाणं होतंच,
माझ्या लहानपणी.
वर्गात होती एक
मोनालिसा गुणी.
एक दिवस तिचा बाप–
(राजकीय पुढारी वगैरे–)
शाळेत आला.
तेव्हा मी मोठ्यानं मनात ओरडलो–
– ‘ रात्री एकाच फर्माईशीवर
अख्खं बंडल उधळणारा. हाच तो पठ्ठा! ’
नंतर मी मोनालिसेकडे
नेहमी कीवेने बघायला लागलो.

० ० ०

मु. पो.
**सेन्ट्रल जेल, कैदी नं. ४१८**

डोक्याला घेऊन ॲल्युमिनिअमच्या
ताटल्या.
बुडूक अंधारात सोबत बराकीच्या
भिंतीची.
मरेपर्यंत सोबत तिचीच
विचारीची.
आम्हा पिंजऱ्यातल्या माणसांना
तिचीच ओढ सायंकाळी
शरिराचा चुरा करून येताना.
वार्डरांचे दंडुके खातानाही—
बराक—भेटीचा आनंद.
पीटो सालेको', 'सेपरेट में खो',
'मस्ती मे आया हैं', 'मुँहपर रोटी फेकताय
साला !'
हे नेहमीचं ऐकणं.
आणि दंडुक्याच्या रेषा—हिरव्यानिळया.
बराकीची ऊब साली वेगळीच.
रानांधरात कवेत घेणारी.
दगडी भिंती—दगडी हृदयांच्या
वेढयातली हीच नेवढी जिवंत हृदयाची.
उंच गेलेल्या दगडी भिंती—
उंचावरची इवलीशी वाकुल्या
दाखवणारी खिडकी—
छताला बिलगलेली जळमटं
पाहणं.

हवालदाराचे शब्द ऐकणं-
'उठो, सांलों-अभीतक पडे है !'
पुन्हा तेच 'सब ठीक है ऽ ऽ ' वा,
' होशिया ऽ ऽ र' च्या आरोळयांना लपेटत.
या जेलखान्यात आलो- तेव्हाच
फक्त बाहेरचा प्रवेश दरवाजा
पाह्यला होता.
नंतर नेहमीची साखळयाची
खळखळ.
वार्डराचे खेकसणे.
ढेरपोटघा' सुपरींटेंडेंटाकडून
पिटाई.
आम्ही माणसं आहोत !
(त्रिवार खोल प्रतिध्वनि.)
ती माणसं असावीत का
गिर्द्यावर लोळणारी
कार-तिजोऱ्या बंगल्यातल्या
जंजाळातली.
ज्यांच्यामुळे दिसला हा दरवाजा
एक आवाज उठला होता.
डंडा आपटला, त्या आवाजात
तो ही आवाज मिटला.

म्हणूनच
नरकातही आमचं गुणगुणणं
'जिंदगी देनेवाले सुन,
तेरी दुनिया से दिल भर गया ऽऽ'.
सूर्य न बघू शकणारी माणसं आम्ही
माणूसपण हिसकावून
दिलेलं कैदीपण.
कधीतरी फाशीच्या तख्तावर
लटकेल
हाच कैदी नं. चारशेअठरा.
काही दिवसानी पुन्हा येईल
आणखी कुणीतरी
त्याचा वारस.
वस्तीतले रेडे मात्र
पोसतच राहतील.

• • •

## इंडिया

ऑगस्टस बार्थोल्डीचा पिळवटणारा
काळा गुलाम,
रोमची मादक मैथुनशिल्पे,
लिओनार्दोची ' मोनालिसा ',
पिकासोचं ' चाअिल्ड '
म्हात्रेंची ' मंदिराकड 'ची बाई,
करमकरांचे शिवाजीराजे,
गल्लीतले मातीचे गणपती,
ज्ञात अन अज्ञात खजुराहो.
विमानतळावरचे–मॉडेल वापरून
केलेले भारतीय आदिवासीनीचे चित्र.
काश्मिर–उटी–मसुरी–हृषिकेष–स्वर्ग.
वेरूळ–अजिंठा–कोणार्क–घारापुरी.
बिंधास्त फॉरेनर्सच्या सौंदर्यापिपासू झुंडी.
कंचनीची (अखंड सौभाग्यवती!) संस्कृती जगत भारत.
मर्लिन मन्रो, हेमामालिनी, गिरीश कर्नाड.
अमृता शेरगील, अवनींदनाथ, आलमेलकर.
संस्कृति, परंपरा, वगैरे.
इंग्रजांनी आमच्यावर राज्य केले,
त्या स्वातंत्र्यवीरांचे पोवाडे गात भारत.
सौंदर्य, सौदर्य निसर्ग–वैभव –वगैरेवगैरे.
प्राचीन संस्कृति गुलामगिरी.
उतू चाललेले कोंब.
शेवटी –
' भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे......'

० ० ०

## प्रीती तुझ्यासाठी

प्रीती–
मी आलो अन् तू बोललीस–
माझ्याशी, फक्त डोळ्यांनीच,
तुझ्या मूक वदनावर ठेवून गेलीस
अनेक संवाद–गीते,
अन न बोललेलं बरंच
तू रात्री, अगदी मध्यरात्रीपर्यंत
तंबोरा छेडीत बसायचीस ना
अगदी तीच धून तरळली बघ,
माझ्या हृदयावर...
कमळस्पर्शानेही शांतपाण्यावर
उठवेत तरंग जसे.

• • •

प्रिये...तू माझ्यासाठी बरंच
काही केलंस...
एकटयासाठी गायलीस...मैफिलही सजबलीस.
नुकतेतच सर्व काही सांगून गेलीस–
डोळयांनी
निरोप दिला.. अनेकांच्याबरोबर
तो ही डोळयांनीच.
...पण काय गं, हे अश्रुपूरही
संसर्गजन्य असतात का ?
प्रीती–
तू असशील हरवली कुठे–
या बेकाठ गर्दीत.
पण आहेस माझ्या मन:पटलावर
तुझी धून अजूनही रेंगाळतेय...
गाणारे डोळेही दिसताहेत
प्रीती–फक्त एकदाच.
फक्त एकदाच उत्कटतेने बोल
ती संवाद गीते...डोळयांनी.
हरवलेली तू असूदे ..
पण मी समजेन तू आहेस...
माझ्या रोमारोमांत ..
तुझ्या प्रिय धूनेसहित ..
या अथांग गर्दीसागरात जर भेटलीस
तर मी नाही म्हणणार पुन्हा
'पॅरडाईज लॉस्ट' म्हणून.

• • •

## शहरातले रस्ते, चाअिल्ड वगैरे

रस्ते. हे असे लांबवर चिकटलेले असतात.
कोळ्याच्या जाळ्यासारखे.
अन ओकतात गरळ : माणसांची.
गर्दीतली माणसं : दाढीवाले. चष्मेवाले
असे, तसे, इत्यादी, इत्यादी वगैरे वगैरे.
बुल्गानीन दाढीतले नेंहरूशर्टातले कवी.
शिल्पकाराने कोरलेल्या चेहऱ्यासारखे चष्मेबद्ध.
रस्त्याकडेला कुणी उभी असते–
' व्हीनस' च्या स्टाईलमध्ये.
गच्च बांधलेली स्त्री गर्दीतून कटत असते
पिकासोच्या चाअिल्ड ' सारख्या पोराला घेऊन
रस्त्याकडेला एखाद्या खिडकीतून मोनालिसा
खिक्खिक् करीत असते.
या साऱ्यांना पचवित रस्ते लाँबवर–
चिकटलेले असतात. कोळ्याच्या जाळ्यासारखे.
आपण असतो त्या जाळ्यातील दुर्बल भक्ष्य.
व्हीनस सोडल्यास.

एक उत्कट इच्छा होती : जबरदस्त ब्रशने
अफाट कॅन्व्हासवर रंग उधळण्याची.
टॉस उडवून निर्णय घेणारा मी.
मनात असूनही नाणं उलटं पडलं.
ब्रशच्या झिज्या उडवल्या गेल्या.
कृश शरीरातल्या दाढीमिशातल्या –
वेड्यानं उडवाव्या तशा
उत्कट इच्छेचं पोर्टेट कधी जमलंच नाही.
कॅन्व्हासवर रंग उधळलेच नाही.
अन कहानी होऊन बसलीय
जिंदगीच्या कथ्थेची.
एक हिरवं टंच लँडस्केप : त्याचा प्रलय झाला
कुठेतरी रेडस्पॉट्स लुकलुकले.
हिरवा कंदील दिसायचा नव्हता म्हणून
आणि प्रवेश केलाय ... पेटाऱ्यातल्या कोंबड्या,
मेंढ्या– शेळ्यांच्या बाजारात.
त्यांच्यातलाच एक बनून. कुठेतरी
बळीचा बकरा म्हणून उपयोगी पडेल.
रंगच हरवलेत : अन अनेक चित्रं
असेही झालेत : बिनरंगरेषांचे,

• • •

हरेक राजवाड्याचे दरवाजे खुले तुला,
पहारेकऱ्यांची मढीही झोपी गेलीत.
तेव्हा रात्रही झालीय मध्यरात्र . . .
सूर्यही नेलाय अंधाराने कोठडीत,
मी तरी असणार काय ?
कॉईन हैज टू साईडस
मी ही जाणार अंधारकाल कोठडीत
सूर्याच्या विरहात– अंधारात साथ त्याचीच.
स्वर्गाला पृथ्वीवरुन वाट जाते म्हणे.
तिथेच कदाचित तुझी माझी भेट होईल.
स्वर्गाला जाणारा हाय-वे असला तर,
तो पर्यंत जगेन फाशीला जाणाऱ्या कैद्यांसारखं.
अग्निदाह पचवीत. अंधारकोठडीत,

**ओवी**

गावागावातून, घराघरातून एक सूरावट
झंकारली.
थरथरत्या भल्या पहाटे नादब्रम्हाने चिंब
भिजली.
लाजवित अन होत रोमांचित ये आठव
निशा निमाली.
लाजत गूंफित नाव कुणाचे, पहाटे एक ओवी
उमटली.
–ओवी जी काल ऐकली आज अचानक
कुठे हरवली ?
–घरघर पहाटची कुठे आताच बेनाम–
रली ?

## शल्य

तिरडीवरच्या मढ्याला विचारल्याखेरीज
मी मरायलाच नको होतं.
तुझ्याशी भेटण्याआधी मी,
तुला भेटायलाच नको होतं
भेटल्यावर आपण हें असं
तोडायलाच नको होतं
काही झालं तरी मी ही,
थोडं सहन करायलाच हवं होतं.
आपल्या जखमेचं थोडं शल्य–
तू ही बाळगायला हवं होतं.
. . . हे निसरडे अनुभव मी,
अनुभवायलाच नको होते.
यासाठी मात्र मी जगण्याआधी
परतीचं तिकिट –
काढून ठेवायलाच हवं होतं.

## दिवेलागण

प्रत्येक दिवसापाठी एक सायंकाळ
प्रत्येकच तशा विविविध रंगी.
पूर्ण काळचा काळोखात श्वास तरी–
घेता येतो.
या झावळल्या प्रकाशात गुदमरायला होतं.
सुस्त अन उदास दिवसभराचा गर्भ–
अनौरस वाटावा बेचैन वा अस्वस्थ करणारा
आणि डोक्यावरच्या पदरासहित
बांगड्यांची किणकिण–
प्रत्येक देवापुढे संस्कृतिप्रिय पवित्र
दिवेलागण.
पवित्र तुळस अन तुळसभर अंगण.
आता साली सारी भकस.
हरवलेली दिवेलागण.
या स्मशानवत घरट्यातला–
मी प्राणी एकमेव,
बाहेरच्या म्युनिसिपालीटीच्या
इलेक्ट्रिक दिव्यांची दिवेलागण बघत.

## पखाल

मनाच्या पाठीवरील पखाल
कुठेतरी रिती व्हावीशी वाटते
वेशीवर मरण आलं त्यांना
आयुष्याची व्यथा ओकावी शी वाटते.
शेव्हरलेट मालकांच्या
गाायिल्या जातील गाथा
कसायाच्या टांगल्या बकऱ्यासारख्या
आयुष्याच्या शिवल्या जाणार नाहीत व्यथा.
ही व्यथा कुणा एकाची
फाटक्या नशीबाच्या
फाटक्या माणसाची,
जिरलेल्या आवाजाची.
खूप काही असतं ओकण्यासारखं.
वेशीवरची कुऱ्हाड कोसळले,
पखाल फुगलेलीच असते.
व्यथा रितीच राहते.
जरलेल्या आवाजाला,
वेशीवरचे मरण जवळ करते.

सिनार–२०

दंवदंव चिंब मी : दंवदंव चिंब तू.
कणकणात रोमांच.
सद्याच्या आंतरिक भावनेसारखा
रंगरंगून आपण.
चिंबचिंब आपण.

## वेल

ती परिचित होतो तुझ्या
रोमारोमांशी.
माहीत असूनही अनुबंध
काटयाचे फुलाशी
दररोज विराटवृक्षावर
अवखळपणे घट्ट लपेटत जाणारी
तू एक वेल
मी–
पिंडीवर वाहिला जाणारा कळया पुष्प अन बेल
फुलांशी जमणारही नाही माझे नाते.
पण सायंकाळचे हिरवळीतले गुपित
सांगणार होतीस, ? सांगना – ते
वेडी आकांक्षा मनीची
झुडुप ताटव्यातच गुदमरते
वृक्षापर्यन्त पोचण्याआधी
बलीदान करते
–वेली तू वृक्षावरच चढत जा
आकाश पक्ष्यांशीच सूर मिळवित जा.

बैल, कोकिळा, कावळा, मोर, प्राणिमात्र
यांना स्वप्ने पडत असावीत का ?
बहूधा नसावीत
आणि जरी पडत असली तरी–
ती बंद झाली पाहिजेत.
माणूस कुठल्या अंतसीमेपर्यंत
पशू आहे.
किंबहूना आपल्याला व्याख्याही
बदलाव्या लागतील–
माणूस व पशुपणाच्या.
म्हणून असंच करू या ना
त्यांना तसंच जगू देत.
स्वप्नाविना वा स्वप्नांसह.
अपर्यायी जीवन.
आणि आपल्यासारखंच अनुत्तरितही
तेवढाच आपल्याला एक हमसफर.

## कद

निमुळते लांबलचक अन उंचच उंच
दगडाळ अन अंधारटंच,
कुबट ओशट अन असह्यवास
माझा अन् अंधाराचा बंदिवास
अशा या कोठीतली कैद
( सारी सुखं झालीत शहीद )
कैद काळोख तुला माहीत आहे काय ?
नाही ना ? नसणारच.
तडफडणारा आत्मा माझा.
मिळवू पाहतो एखादी फुंकर
झालंच तसं तर, मी ही विहरेन–
दृष्टीभर हिरवाईत मस्तमौला बनून
मी ही झंकारेन गात्रागात्रांतून.
अन मग झालंच शक्य तर
तुझ्या डोळयात उभे करीन
मनोरे, आपल्या भविष्याचे

## कूजन

पहाट उमलत जाते हळूवार
जितक कोमल रक्तरंगानें
तुझ्या आरक्त गाला वरच्या  लाली सारखी.
अन् हळूच उठते पहाट परिसरावर
कोकीळ कुहू
वैशाखातल्या अस्वस्थ दुपारी
डोहात उमटावेत प्रतिध्वनी
तशी पुन्हा एक कोकीळ कहू
निशेत  एकवटताना
नेत्रकळघा  मिटतांना
मी होत असलो बंदिस्त भ्रमर जरी
बाहेरच्या जगाशी संबंध माझा
कोकीळ कूजनापुरता
निशेवर उमटलेल्या
शेवटच्या कुहूऽशी.

सिनार--२४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७६२
दा. क्र. २३६९८
काव्य ३५५८
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

## रान

एक झुळूक कोमल,
अन् दोनक्षण पानगोळः अविरत
दाहदाह शरिर नाजूक फुंकर
आकाश सारे निर्मळ निर्मळ.

उजाड रान, पर्णहीन झाड
मन रडू–रडू, दाटले भरून पूर
झाड माझा सखा की मीच तो पूर्वजन्मीचा
आकाशभरून बोडक्या झाडाचे सूर.
अस्वस्थ झावळ अन असे हे झाड.
अवकाशप्रलय व्यापून मनात, त्याचं
झाकोळणं.
शरीरभरुन अंधार :शिरेशिरेतून धार–
अस्वस्थतेची.
उन्हाळले वातावरण, काटक्यात मरण
जगतेय

## प्रवास

मी खूप मृगजळं अनुभवलीत
तेव्हा आता त्यांचा बराच
अनुभव गाठीशी घेऊन
पुढच्या कुंद, निर्जन
न संपणाऱ्या रस्त्यावरनं
प्रवासासाठी सज्ज आहे.
नशीबाला दोष देणं वगैरे
आता सोडून दिलंय.
म्हणून तुम्ही मला
' विश यू हॅपी जर्नी' वगैरे
विश करू नका
निधास्त बेपर्वा सूरांनो–
मग तुम्हाला ' गुड बाय करु ' का ?

सिनार–२६

## रस्त्यांच्या कविता

रस्ते–
रेंगाळणारे–वाहणारे.
सुस्तावलेले–निद्रिस्त.
रस्ते–
रवंथ करणारे.
रस्ते–
सर्पील आकाराच्या विळख्यांनी
शहराला आवळणारे.
रस्ते–
माणसांचे लोंढेच्या लोंढे गिळणारे–
रस्ते–
नकाशातली अतिशय बारीक वीण
बनून असलेली नक्षी,
रस्ते–
अकल्प क्षणपळांचे साक्षी.

२.

रस्त्यांवरील माणसे–
रस्त्यांवरील वाहने–
रस्त्यांवरील जनावरे.
रस्त्यांवरील खांब–तारा–दगड–पाणी.
रस्त्यांना वाटा–गल्ल्या–बोळी.
कुणाच्या वहिवटाही.
रस्ते–रस्त्यात–रस्त्यांना.

३.

कुठेही रस्ते फुटू शकतात.
चौरस्ते –मार्ग–महामार्ग.
पाऊलवाटा–गल्ल्याबोळी.
बारीक भयंकर नी–
किचकट जाळ्यात–
अडकलेले रस्ते.
कोळ्यांच्या जाळ्यातले
भक्ष्य जसे.

४

रस्त्यानें रस्त्याला
विचारलं–
आपण कुठे जायचं ?
-अनेक पावलं जातील तिकडं–
खेचत जायचं.

५.

रस्त्यांनी रस्त्यांच्या सभेत,
जाहीर केलं–
आपण स्मारकं
-फक्त व्यथेची.

## चंद्राच्या कविता

१.

चंद्र म्हटला की,
एक पृथ्वीभोंवती फिरणाराच
चंद्र चांदण्यात फिरणारा
चंद्र कसा कुणास ठाऊक,
बहुतेक कुणा उर्वशीच्या
चेहऱ्यासारखा.
चंद्र मधाळ. चंद्र अमृतमय
चंद्र पोर्णिमेचा–अमावस्येचा
अन अनेक पोर्णिमांचाही.
उदा. नारळी–कोजागिरी.
माणसामाणसांतून फिरणारा.

२.

त्यावरचे डाग. त्यावरची माती·
त्यावरचे पाऊल. मानवाचे.
त्याची शीतलता.
चंद्रबिंब. पाण्यातले. नभातले
तिच्या चेहऱ्यावरची अनेक
चंद्रबिंबं.
तो साक्षी खिडकितून वा
निंबोणीच्या झाडामागून
कुठल्यातरी रात्रीचा.

३.

अर्धचंद्र–पूर्णचंद्र,
चंद्रकोर–
कुणाच्यातरी भाळावरील
कुंकवासारखी.

४.

चंद्र–उदा. परप्रकाशी.
त्यानं मित्र मानलंय मला.
मी पारदर्शी.
आपणही मानतो त्याला.
नाहीतरी या जगभरच्या
कचऱ्यात, तगण्यासाठी–
अवकाश अंधारच आधाराला.

५.

चंद्र–दहा चंद्र–बाराचंद्र–
अवकाशात इतस्ततः.
तो चंद्र–पृथ्वीचा.
त्याला शाप दिवसाचा
मी सोबती अंधाराचा
त्याला उःशाप रात्रीचा.

० ० ०

प्रलयात अश्रूंनी साथ केली,
कळयातच पहाटे होतो
कळयातच रात झाली.
उमलणेइच्छिले होते
कोमेजण्यात कहाणी संपली
शब्दांनी क़हाणी उसवली
अश्रूंनी ती आंदोळली...

बदलणारी वळणे
कुठल्याशा वळणावर
आपण क्रॉस झालो.
कुठल्याशा वळणावर
'बाय्' झाला.
पुढील वळणेही येतील
आठवणीनी ओथंबून
आजच्या सारखी.

० ० ०

चंद्राच्या निर्मळते बाबत
तुझं म्हणणं -
त्याची हिरावून घेतली
शुचिता
तू त्याची बात करतेस
पण इथं प्रेतदहनासाठी
लाकडंही नाहीत
कशावर जळावी चिता ?

० ० ०

येणाऱ्या प्रत्येक सालासाठी
अश्रूनी सांत्वन करावे शब्दांचे
वाढत्या अनुबंध गाठी.
सांत्वन कुणी करावे अश्रूंचे !
अनुबंध का फक्त तुटण्यासाठी ?
असेच असल्यास शब्दाश्रूंचे
सांगडे उघडे पडावेत
गेल्याप्रत्येक सालाकाठी.

० ० ०

आत्मगुंजन :
नाद–लय, ऱ्हीदम मेलडीत
गुंगून.
आणि साहणं –
कर्णकर्कश अश्रवणीय आवाजही.
काय साला माणूस मी,
की रहाट गाडग्याला बांधलेला.
– वा भोवऱ्यातून बाहेर पडणारा
कस्पटकण.

○ ○ ○

सृष्टी पाझरते नादब्रम्ह
सृष्टी उधळते रंगरंग
एक असीम–अव्यक्त वेदना
चरचरत जाते,
पोळत जाते, अंगअंग.
सशारिर वेदना
दु:खाधाराची निकट नातलग
भस्मवत जाते माझे आस्तित्व
किंवा मी काय जो असेल तो
मी यावेळी चित्रकार
वा संगीतकार तरी
असायला पाहिजे होतं.

○ ○ ○

इतकं दुख पाठीशी बांधावं, की
आभाळानंही क्षणभर –
फाटून बघावं
जखमांनीही इतकं रक्तांळून जावं
की रक्ताळल्या क्षितिजानेही
दोन अश्रू गाळावेत.
इतका भार पेलून पहावा, की
धरतीनंही अवाक् व्हावं.
इतकं उध्वस्त होऊन जावं, की
अश्वत्थाम्यानंही हतबल व्हावं.

० ० ०

मला सतरादा समजावण्यात
आलं :
प्रवाहाविरूद्ध पोहू नये.
उरी फुटण्याशिवाय काही होत नाही.
–पेक्षा प्रवाहाबरोबर वाहत जावं,
कुठे तरी किनारा मिळतोच.
आता सवय झालीय.
म्हणून अजून बेकाठच आहे,
उरी फुटणाऱ्या मला जपत.

० ० ०

वावटळ झाली तेव्हा –
गावातले प्राणी
लपून बसले होते
चार भिंतीच्या आडोशात
कोंडग्यावानी.
घरटं तुटलेली सुगरण
तेव्हा दगडाच्या खाचेत
रडत होती...

० ० ०

आकाशाच्या निळाईत मोठ्या
विश्वासाने शिरलो होतो...
विसावू पाहत होतो...
माडांच्या उंचीचा मला
अभिमान होता.
आकाशात शिरणाऱ्या त्याच्या
शिरांवर – मस्तकावर गर्व होता.
(माझ्या बाबतीत मात्र–)
मला काय माहीत होतं–
माझा असा ध्रुव होईल म्हणून

० ० ०

स्मरणचिंब मी... आत्मगर्द मी.
पाझरले आकार उकार
छंदचिंब रेषा– सर्वव्यापी रंग
स्मरत या इथे स्मरणचिंब उभा मी.
–रित्या अंधार अवकाशाच्या सीमेवर
आणि इथवरच सोबत यांची
...याच समेवर थबकतात सारे रंग...
रंगातल्या रेषा...पोत
क्षणभर इकडे बघून झाल्यावर
मी वळतो : मी निवळतो,
आणि मी असाच नेहमी
निथळून निघतो !

० ० ०

डोळ्यांना फुटूनी पंख
मी वाचली अक्षरे
अवकाशातली...
भरकटणाऱ्या दगडांची
चाकोरी
अन चाकोरीत अडकलेले दगड.
स्थिर अधांतरी
भयानक अन अवकाश भरून अंधार.
सारं सारं काही वाचलं या डोळ्यांनी.
त्याक्षणी डोळे झाले पांढरे...
अन पंख ओढले... गोरठले...

० ० ०

अश्रुतपूर्व नादांची
संवेदन आंदोलने.
अशीच उन्हाळत्या दुपारी–
कानात भिरभिरत येऊन
गुणगुणतात.
हळूवार मग अचेतन
बधिरता.
आणि हळूहळूच मग
कुठेतरी परिचितता
वाटत जाते.
अचेतन वास्तवासारखी.
अन मग वाटते –
ही संवेदन आंदोलने–
त्रिकालाबाधित राहून
भिरभिरावीत
गुणगुणावीत.

० ० ०

पणती
टिमटिमती – मिणमिणती.
मात्र तेल संपत आल्यावर
ज्योतीची न बघवणारी धडपड.
पणती अमावस्येच्या रातीची,
नदीच्या लाटेवरची,
विझण्याआधी किनारा सापडतो की नाही (?)
किंबहुना किनारा न सापडण्यासाठीच
सोडत असावेत.
पणती
अंधारातल्या देवघरातला
देवाला उजळवणारी
सायंकाळ जाणवून देणारी...
जाणती अंधार नायिका
पणती...

० ० ०

तुझे हंसणे–
फिर मिज्या ढगासारखे
अन माझ्या अर्धवट स्वप्नात
तुतारी केकाटणे
उद्याची.

म्हणालीस–
दे ना, मला अमृतपेला,
मग म्हणालीस–,
नको, माझ्या मनातलं
दुधाळ चादणं
नासून गेलं आहे.

मी, निघतो म्हटलं.
तू म्हणालीस,
नको–
श्वास गुंतले आहेत ।
श्वासात
शर्टाच्या गुंडीशी
चाळा करीत
बडबडत होतीस.
मी सूर्यास्त बघत होतो–
मनगटाकडे बघत तू
म्हणालीस–
मी येते.

तू म्हणालीस–
एक होता तू ;
एक होते मी
मी म्हणालो, आज मासा तर नाहीच,
जाळंही बुडालं सागरात.

तुझ्या जालीम–
नेत्रापासूनच्या बचावासाठीच
मी इंद्रधनु मागचं आभाळ झालो.
नेत्रा आड गेलो, अन
उडवून घेतले
रक्त शिनोडे.

तुझ्या अलम नभोराज्यात–
मी थोडेसे तुषार उडविले–
म्हणून काय झाले ?
तू तर माझ्या विस्तीर्ण पेंटींगवर
चिखल उडविला होतास !

सूर्यफुलासारखं सर्व दिशा
वळायला लागलीस,
मी पूर्वेकडेंच तोंड करुन
उभा राहिलो–
मधल्या काळात तू
दाहीदिशा फिरुन आलीस.

धावून–धावून
उरी फुटणारा मी.
अन तू–पुढे वाढत जाणारी
मृगजळासारखी

जथे टेकायचेत हें ओठ
यातून असल तीखेपण पाझरतंय
मग असं का?
प्राचीन काळापासून वाहवत
आलेल्या रडकथे सारखं.
जखमींच्या साकळल्या–
हिरव्या जखमेसारखं
मला काय माहीत होतं,
हे असं इतकं भयानक असतं !

डवरलेल्या दाट रानातून
लाल फुलांतून–
जाणाऱ्या रस्त्यावरुन
जायला लागलो,
मला काय माहीत होतं
पलीकडे वखवखणारं
स्मशान आहे.

फ्रेममधे मढवलेला
माझा चेहरा.
आणि दररोज बदलणारे
चौकटीतले भाव
दरम्यान एकेक चांदणी गळतेय.

मुखवटे घालून नाचतोय–
दोरा नाचवेल तसा.
कठपुतळी. कुठपुतळी.
मला माहीत नसतं
वाळूच्या किनाऱ्या नंतर
पाऊल खुणाचं नाटक
संपतं म्हणून.

ठच चालतानाच लागते
मलाही ती निर्हेतुक चालताना लागली.
आणि सारं आयुष्यच माझ्या
पायावर धोंडा होऊन कलंडलें.
तेव्हापासून एक झालंय–
मी भूतभविष्यात टेहेळणं सोडून दिलं,
वर्तमानाशी असलेले टाके
उसवून टाकले.

हीच एक वेळ आहे, दोस्तों–
या मैफिलीतून विदा व्हायची.
एरव्ही तरी मी
एक अदृष्य . . फिकट
होत चाललेला बिंदू होतो
अस्पष्ट होत जाणाऱ्या
तुमच्या मैफलीतील स्वरासारखा.

० ० ०

सध्या मी :
व्याधीग्रस्त शिळाय;
भविष्याकडं जाणाऱ्या
रस्त्यांवर पडलेली.

बाकी मानलं तुला–
अभिनयाबाबत.
आपल्या लग्नाच्या फोटोत,
काय मस्त स्माईल करतेय्स !

• • •

हेच दिलंस का मला–
मरत मरत जगणं
आख तुटलेल्या चाका सारखं–
रखडत रखडत जगणं
बुडूक अंधारात रसाळ चंद्रभा
डकवल्या सारखा स्थिर आहे.
मी गर्द अंधारात चाचपडतोय
माझं जिणं.

• • •

दबले ओठ
मुक्या व्यथा,
कुबट जीवन.
भिती बरोबर
मरणाची कुणकुण.

० ० ०

खूप रिचवलेत–
पेग जहराचे,
आता आयुष्य
ओकून टाकावेसे वाटते.

आभाळाला पॅराशूट छत्री बांधली तर !

० ० ०

आदम पुरुषाचे
तकलादू वंशज–आदमी आम्ही,
वैशिष्टयासह जगतो
येणारा अलवार दिवस
अल्लाद जगवतो !

अंधारवेडा चित्रकार :
अन-घासून –घासून झिजलेला
कुंचला.
प्रचंड चित्रांच्या
मुखवटया आड
कोऱ्या आकाशाचा शोध घेतोय.

अंतहीन काळोखभुयार, व –
मी प्रवासी एकमेव : पाठीवर दुःखवेदना.
गर्दगच्च काळोखात तिची सोबत.
टिमटिमता आत्मा –
मिणमिणतोय सवयीने...
आणि सवयीनेच आता
सवय झाली दुःखवेदनेची
इतकी की तोवरच
मिणमिणता आत्मा
जोवर सोबत काळोखदुःखाची.

मी जळतोय आज
माझा मीच
भयाण अग्निजिव्हांत.
तुमच्याखातर, शद्घाखातर.
आणि स्वतःच्या कमकुवतीखातर.
जळो मी आज असाच.
पण शेवटी मात्र
माझ्या मुळातला मी
जन्म घेणारच
फिनिक्स सारखा.

० ० ०

पोर्ट्रेट :

वैजनाथ,
तुझ्या कॅनव्हासमध्ये
अडकलेल्या साऱ्या प्रकाशाच्या,
साऱ्या काळोखाच्या चौकटी
तू अशा सांधून घेतल्यास,
जसं–
सामावून घेतलं हे कडूजहर जग
तुझ्या ब्रशवरच्या काळचा रंगात
असं तोललेलं तू आदिम दुःख
तुझ्या चक्क हाडामासाच्या पिंजऱ्यात.
असेच कोंबलेले तू या बेवफा जगाचे
चेहरे, एक्स्पोज करून–
तुझ्या खांद्यावरच्या शबनममधल्या
स्केचेसमधे.
रेषान्‌रेषा अशी एन्लार्ज करून
तू असा चालत असतोस बेतकार.
अंधाराच्या सावलीचं पेंटिंग
लटकत ठेवून, तू–
कव्हर डिझाईनच्या येणाऱ्या बाकीचे
हिशेबाचे कागद चुरगाळून–
फेकून देतोस.
रंग देऊन झाल्यावर ब्रश धुतोस तसा.

० ० ०

मागच्या खिडकीतून अशी–
हिशोबांच्या कागदांच्या कपटयांची
थुंकी पडत जाते.

साचत जाते.
पण त्यातून कुठलीही छत्री
उगवत नाही.
तुझ्या खोलीला कॅनव्हासच्याच–
भिंती करून,
भिंतीभिंतीला पेंटिंग्ज
लटकलेले.
पेंटिंग्जमधून महान पहाडातला
बेमालूम शहरी अंधार.
कुठून-कुठून जमा करतोयस हा अंधार ?
मागे दोन दिवस, शिशिरात–
दौलताबादच्या डोंगरांमधे
बेहोष फिरत होतास
वैतागून, स्टुडिओतून पळून.
धुंद होऊन.
शेवटी बाटलीला अन् दारूलाही
नशा येऊ लागली असावी.

• • •

तुझ्या अनवाणी पायाखालचा
अंधार.
खांद्यावरच्या झोळीतला
अन् तुझ्या पोटातल्या
आतड्यातलाही.
किती पितोस ?
तुला असं असहाय व्यसनच
अंधार पिण्याचं.
खरंच वैजनाथ, मला फार

शरम वाटते जेंव्हा आम्ही
विसाव्या शतकातली
वैफल्याची अंधारधून
मजेखातर गात असतो
तेव्हा.

• ० •

तुझ्या दाढीतल्या जंगलातला
एकदा केस उपटावा,
तसा तू सहज
ढोंगी मुखवटचांना
तुझ्या हिशोबातून बगळतोस,
तेव्हा माझं डोकं तिडकतं.
मी भकभकतो—
त्यांच्या माना कोंबडयासारख्या
पिरगाळून टाकाव्यात म्हणून.
माझं हे असलं ऐकून
तू भयंकर क्रूर हसतोस ...
पहिल्या बोटानं
सिगरेटच्या टोकावरची
राख झटकतोस.
बिनधडाच्या त्याच्या
शरीरावर थुंकतोस जणू.

तुझे डोळे सदा कुठल्यातरी
मध्ययुगातल्या अज्ञात प्रदेशात
हरवल्यासारखे...
जी. एं. ' च्या गोष्टीतल्या प्रदेशात
हरवल्यासारखे ..
मी तर त्यातून बाहेर
येता येता किती घाबरून',
भेदरून–हादरून जातो.

केव्हापासून बघतोय् मी...
तुझ्या आठ–बाय–आठच्या
खोलीतले पसरलेले प्रचंड कागद.
एवढे की तुला झोपायला
अंथरुणाचीही गरज नसावी.
कित्येक रेखाचित्रांचे वाळवंट,
वाळवंटातले प्रचंड प्रदेश–
तू अंगाखाली घेऊन,
वाळूच्या वादळात हरवून–
आभाळामधल्या अंधाराची
चित्रे रेखाटायचास.
मिच्च अंधारातच
अनवाणी पायाने
आपण टपरीवर चटा प्यायचो.

तेव्हाही तुझे डोळे
कशात नसायचेच.
त्या डोळ्यांचे प्रदेश मला
सापडलेच नाहीत अद्याप.
आलमेलकरांचे पत्र
मला दाखवताना,
त्यांच्याकडून आल्यावर
या गर्दीत मिसळल्यावर–
हे डोळे उलटा प्रवास
करतात.
वर्तमानपत्राच्या कचेरीबाहेरच्या
बाकड्यावरचे चार चार तास.
किंवा रस्त्याचे डांबरी चटके–
शोधत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४६२
दा. क्र. २३६१७
काव्य अथवा
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

○ ○ ●

मृत्यूत्तर सावल्या विसरून
वेरूळच्या लेणीतील यक्षाचे
नितळमंद डोळे,
लयकारी घाट अन्
अनेक पेंटिंग्जचे आत्ममग्न डोळे
बाजूला सारून जरा पुढे
आलास ना,
या प्रचंड बेगडी प्रदेशावर
काळोख होईल...

REFBK-0023617
REFBK-0023617

○ ● ○

कविता हा जगण्याचाच एक अपरिहार्य भाग होणं आणि निव्वळ वर्तमानात जगत राहणं, ही गोष्ट तरूण कवींच्या कोलाहलात ज्या दोनचार संवेदनाशील लोकांच्या नीटपणे लक्षात आलेली आहे त्यात गणेश विसपुतेंचा समावेश होतो. कविता हे त्यांनी मुद्दाम घेतलेलं व्रत नसून त्यांच्या जगण्याचंच सांस्कृतिक नाव आहे आणि मुक्तपणे जगत असतानाची सहजता आहे. त्यांना कठोर होऊन स्वतःकडे बघता येतं आणि त्यांची कविताही तशीच स्वतःकडे बघून विश्लेषण–संश्लेषणाचं व्दैत अनुभवत उभी राहते. तमाम गोष्टींकडे अश्रद्धेनं पहात असतानाच जगण्यावरची श्रद्धा उत्कट होत असते, हे त्यांची कविता वाचत असताना आपोआपच लक्षात येतं. हे सहजासहजी जमण्यासारखं नाही. त्यासाठी कवितेला 'बाजारबसवी' करून तिच्यावर ऐहिक उन्नती करू पाहणाऱ्या अनेक उत्साही तरूणांसारखी धडपड चालत नाही, तर 'अगा आत्मजेच्या विषीं । जीव जैसा निरभिलाषी ।' अशी ज्ञानेश्वरांनी सांगितलेली 'अशेष' होण्याची विलक्षण किमया साध्य करावी लागते; आणि तो स्पर्श विसपुतेंच्या कवितांतून जाणवत राहतो. उत्कट जगण्यातल्या सगळ्याच रीतींचं उत्तर 'दुःख' येत गेलं, की कवितेसाठी सुफलसम्पूर्ण जमीन आपोआपच तयार होत असते, हे या कवितांतून अभिव्यक्त होतं. त्यांच्या कवितेतील प्रेमभावना एखाद्या उध्वस्त, भग्न वास्तूसारखी आहे आणि ती बघणाऱ्याला आत्मकेंद्रित करायला लावणारी आहे. त्या वस्तूची भग्नता, उध्वस्तता आणि नसतेपणा हेच वास्तव आहे आणि हेच समकालिनत्व, हे विसपुतेंना नेमकं माहीत आहे. दुःखाच्या परी 'अस्सल' असल्याची जाणीव या कवितांतून सतत होत राहते; आणि ही एवढीशी गोष्टसुद्धा विसपुतेंना नव्या लोकांच्या बाजारू गर्दीत स्वतःचा चेहरा जिवन्त ठेवण्याइतपत आधार देणारी आहे.

cover at ; venkatesh mudranalaya aurangabad.